# अंतरलहरी



कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, मुंबई

मे - ऑगस्ट २००९ वर्ष २ अंक २ पृष्ठे ८ रु. २/-

## मन सर्व प्रकारच्या हिंसेपासून संपूर्ण मुक्त असू शकेल का?

**प्रश्नकर्ता** : आपले दैनंदिन जीवन जगत असताना जगात जे घडत आहे त्याची जबाबदारी आपण कशी घेऊ शकणार? हिंसेबद्दल योग्य कृती काय, हिंसेला तोंड देताना योग्य वागणे काय असते?

**कृष्णमूर्ती** : बाह्य जगात जे घडत आहे त्याहून आत काय घडत आहे ते वेगळे आहे का? जगात हिंसाचार, असामान्य गोंधळ, आपत्तीमागून आपत्ती चालू आहे. युध्दे चालू आहेत, देशादेशात विभाजन चालू आहे, वंशिक, धार्मिक, जातीय फरक आहेत. कल्पनांचा पध्दतशीर बसवलेला एक संच दुसऱ्याच्या विरोधात असतो. हे सर्व आपल्या आतमध्ये जे घडत आहे त्याहून वेगळे आहे का? आपण देखील हिंसक आहोत, आपल्यामध्येही पोकळ दिमाख आहे, भयंकर अप्रामाणिकपणा आहे, वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळे बुरखे पांघरणे आहे.

तर मग ही एकच गती आहे जसे भरतीच्या लाटेचे बाहेर जाणे आणि आत येणे. बाहेर जे काही घडत आहे, ते आपण मानवांनी घडवलेले आहे, आणि आपण माणसे बदलल्याशिवाय कदाचित ते बदलण्याची शक्यता नाही हेच ते मूळ आहे. आपल्याला जगात काही तरी करायचे आहे, चांगल्या संस्था, चांगले सरकार बनवायचे आहे. परंतु जे बाहेर घडत आहे ते आपणच घडवले आहे असे आपण म्हणत नाही. आपण बदलल्याशिवाय ते बदलणार नाही. हजारो वर्षे घालवल्यानंतही आपण अगदी तसेच आहोत. आपल्यामध्ये मूलभूत बदल झालेलाच नाही, आणि जगामध्ये आपण अनर्थ घडवीतच राहिलो आहोत.

सत्य हे आहे की आपण म्हणजेच जग आहे; ही कल्पना नव्हे तर हे वास्तव आहे. कल्पना आणि वास्तव ह्यामधला फरक तुम्हाला दिसतो का? आपण म्हणजेच जग आहोत हे विधान एखादा ऐकतो आणि त्याची संकल्पना बनवतो, त्याला अमूर्त स्वरूप देतो आणि मग त्या संकल्पनेवर चर्चा करतो, ती खरी आहे, की खोटी आहे आणि त्यातच हरवून जातो. परंतु सत्य हे आहे की आपण म्हणजेच जग आहे – *ते* तसे आहे.

म्हणून ते बदलण्याची आपली जबाबदारी आहे, याचा अर्थ आपल्या दैनंदिन जीवनाच्या पध्दतीला आपण संपूर्णपणे जबाबदार आहोत. म्हणजे जो गोंधळ चाललाय तो सुधारणे नव्हे, त्याला सजवणे नव्हे किंवा एखाद्या संस्थेला किंवा समुहाला जाऊन मिळणे नव्हे, तर मानव म्हणून, जो स्वत:च ते जग आहे, त्याने स्वत:मध्ये आमूलाग्र परिवर्तन आणणे. त्याशिवाय चांगला समाज असणे अशक्य आहे.

आपल्यापैकी बऱ्याच जणांना बदलणे कठीण जाते, उदाहरणार्थ धुम्रपान सोडणे. अशा काही संस्था आहेत ज्या तुम्हाला धुम्रपान सोडण्याला मदत करतात! बघा, आपण संस्थावर कसे अवलंबून आहोत. म्हणून आपण बदलत का नाही याचा शोध घेऊ शकू का? जेव्हा आपण एखादी चूक – चूक हा शब्द अवतरण चिन्हात – पाहतो तेव्हा तिला तात्काळ का संपवून टाकत नाही? असे तर नाही की, आपण अशी आशा बाळगून असतो की कोणीतरी येईल आणि या जगात सुव्यवस्था आणेल आणि आपण त्यात सहज प्रवेश करू शकू? की आपल्याला आळसाची सवयच झाली आहे, मानसिक सुस्तपणाची, निष्फळतेची सवय झाली आहे?

एखादे तंत्रज्ञान मिळविण्यासाठी आपण किती वर्षे घालवितो, डॉक्टर बनण्यासाठी शाळा, कॉलेज, विद्यापिठातून जातो. परंतु स्वत:मध्ये बदल घडविण्यासाठी एक दिवस देखील देणार नाही.

तेव्हा स्वत:मध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणे ही स्वत:चीच जबाबदारी आहे. कारण आपण म्हणजेच इतर सर्व जग आहे.

पुढचा प्रश्न आहे: हिंसेबाबत आणि हिंसेला तोंड देताना योग्य कृती काय? हिंसा म्हणजे राग, द्वेष, जमवून घेणे अनुकरण करणे, आज्ञा पाळणे. ह्या सगळ्याला नकार म्हणजे त्यांना विरोध. आपल्या जीवनाचा एक भाग असलेल्या, कदाचित प्राण्यापासून आनुवंशिकतेने आलेल्या या हिंसेपासूने मुक्त होणे – तुलनेने मुक्त होणे नव्हे तर संपूर्ण मुक्त होणे शक्य आहे का? म्हणजे रागापासून मुक्त असणे ह्याचा अर्थ फक्त रागापासून मुक्त नव्हे तर मनात रागच नसणे, किंवा अनुसरण्यापासूने मुक्ती, बाह्य अनुसरण नव्हे तर तुलनेतून होणाऱ्या अनुसरण्यापासून मुक्ती. आपण नेहमी मानसिक पातळीवर तुलनेत असतो

– मी असा होतो, असा होईन, किंवा मी कोणी अमुक आहे. जे मन तुलना करते, निष्कर्ष काढते ते आक्रमक असते. मन जर अनुकरण्यापासून, अनुसरण्यापासून, तुलनेपासून मुक्त असेल तर त्यातून तिथे योग्य कृती घडेल.

मन सर्व प्रकारच्या हिंसेपासून संपूर्ण मुक्त असू शकेल का? जर ते तसे असेल तर जेव्हा हिंसेला तोंड द्यावे लागेल तेव्हा काय प्रतिक्रिया असेल? जेव्हा एखादा हिंसेला समोरासमोर भिडतो तेव्हा कोणत्या प्रकारची कृती घडते? जेव्हा तो हिंसेला सामोरा जाईल तेव्हा काय करेल ह्याचे अनुमान करू शकेल का? मेंदू जेव्हा हिंसेला समोर पहातो तेव्हा वेगाने त्यात रासायनिक बदल होतात; समोरून येणाऱ्या ठोशापेक्षा त्याची प्रतिक्रिया जलद असते, संबंध शरीर प्रतिक्रिया करते, आणि तिथे तत्काळ प्रतिसाद असतो; तो कदाचित उलट थप्पड मारणार नाही, परंतु रागाचे किंवा द्वेषाचे अस्तित्वच ही प्रतिक्रिया घडवते, आणि मग कृती घडते.

रागावलेल्या माणसाच्या उपस्थितीत, जर एखादा जागृत असेल आणि प्रतिसाद देत नसेल तर काय होते ते पहा. दुसऱ्याच्या रागाची जेव्हा तुम्हाला जाणीव होते आणि तुमची स्वत:ची त्याला प्रतिक्रिया नसते तेव्हा एक अगदी वेगळाच प्रतिसाद असतो. द्वेषाला द्वेषाने, रागाला रागाने प्रतिसाद देणे ही उपजत प्रवृत्ती असते, रासायनिक प्रक्रिया होते तिच्यामुळे मज्जासंस्थेची प्रतिक्रिया होते; परंतु रागासमोर हे सर्व शांत करा, मग वेगळीच क्रिया घडते.

*क्वेश्चन्स् अँड आन्सर्स्,* प्र. १०

# मानवी मन आणि हिंसा

संपादकीय

निसर्ग, प्राणिमात्र, माणूस ह्या सर्वांशी असलेले आपले संबंध हिंसेने व्यापलेले आहेत. आपले संपूर्ण आचार, विचार हे सूक्ष्म किंवा उघड हिंसेने भरलेले असताना त्याचे निरीक्षण करणे कठीण आहे आणि त्यावर वरवर विधाने करणे हे स्वत:शी असलेला अप्रामाणिकपणा आहे. परंतु गंभीरपणे हे समजणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण हिंसा परकोटीला पोचली आहे. तिने घेतलेल्या अक्राळ विक्राळ स्वरुपाचे सर्वांगीण परिक्षण होणे अत्यंत जरुरीचे आहे. सत्ताधाऱ्यांनी एकत्र येऊन त्यावर कितीही उहापोह केला आणि ती दाबण्याचा प्रयत्न केला तरी तिचे मूळ जे मानवी मनात हजारो वर्षे रुजलेले आहे, भ्रम, अज्ञानावर पोसलेले आहे, मनातील काल्पनिक विभाजनाने ज्याला खत पाणी घातले आहे, त्याचा शोध घेतला नाही तर ह्यातून बाहेर पडणे शक्य नाही.

हिंसेने हिंसा दाबता येत नाही याचे उत्तम उदाहरण आपल्या डोळ्यासमोर चालू आहे. अमेरिकेतील टॉवर्सवरील हल्ल्यानंतर दोन न संपणारी युध्दे चालूच आहेत. त्यातून जगाच्या कोपऱ्या कोपऱ्यात आत्मघातकी हल्ले घडतच आहेत. पुराणात ह्या राक्षसांच्या सांडलेल्या रक्ताच्या थेंबाथेंबातून नवे राक्षस निर्माण होत होते अशी गोष्ट सांगतात. आज आतंकवाद्यांची निर्मिती ही काहीशी तशीच वाटते.

आपल्या सुरक्षिततेला धोका निर्माण होतो तेव्हा भीती निर्माण होते, शारिरीक सुरक्षितता ही उपजत गरज आहे. त्यातून उदभवणारी हिंसा ही मर्यादित व क्षणिक असते. त्या भीतीचे जेव्हा मानसिक स्तरावर आक्रमण होते तेव्हा सुरक्षिततेचे जाळे विणले जाते आणि त्यात आपण सर्वच अडकून पडतो. पैसा, देश, धर्म या संरक्षणाच्या फळ्या आपण उभारतो. पण तेच आपल्या असुरक्षिततेला कारणीभूत होतात. पैशामध्ये आपण भविष्याची तरतूद व सुरक्षितता पाहतो. तो गोळा करण्याच्या मर्यादा पण आपण विसरतो. त्यातून केवढी हिंसा व असुरक्षितता निर्माण होते. प्रत्येक धनवानाला अनेक स्तरांचे सुरक्षा कवच लागते तरी खून, अपहरण घडत असतात. लोभापायी आणि हव्यासापोटी द्वेष, हेवा, मत्सर यांच्या कोंडीत माणूस सापडतो. तसेच प्रजेच्या संरक्षणासाठी देश व त्याच्या सीमा निर्माण झाल्या. त्या नेहमी रक्तलांछित असतात. आणि आता तर सीमा सीमा राहिल्याच नाही. कारण आतंकवादाच्या रूपाने, मागल्या पावलांनी ती हिंसा कुठेही येऊ शकते. धर्म तर त्याचा मूळ गाभा सोडून हिंसेच्या रूपाने मनामनात घुसला आहे. त्याचे हिंस्त्र स्वरूप जगभर पहायला मिळते आहे. धर्मभेदामुळे होणारे आत्मघातकी हल्ले ही त्याचीच साक्ष आहे.

भीती, संरक्षण व हिंसा ह्या सर्वांचे परस्परसंबंध आपल्या मनातील अज्ञानात, भ्रमात गोवले आहेत. आपल्याला हे समजले पाहिजे की माझ्यामध्ये भीती आहे तशीच समोरच्या माणसामध्ये आहे म्हणून आपण लढत आहोत. त्यात सुरक्षितता नाही हे समजले तर आपण हिंसेची सर्व जबाबदारी दुसऱ्यावर टाकणार नाही.

मग हिंसेच्या शोधाची दिशा संपूर्ण बदलेल. वर म्हटल्याप्रमाणे तिचा उगम मानवी मनात आहे, काल्पनिक विभाजनात आहे. कृष्णमूर्ती म्हणतात, ‘*जेव्हा तुम्ही स्वत:ला भारतीय, मुसलमान, ख्रिश्चन, युरोपियन किंवा काही म्हणता तेव्हा तुम्ही हिंसक होता. कारण तेव्हा तुम्ही स्वत:ला बाकी सर्व मानवतेपासून वेगळे करता. जेव्हा तुम्ही श्रध्दा, देश व परंपरा ह्यांच्यामुळे स्वत:ला वेगळे मानता तेव्हा हिंसा निर्माण होते. म्हणून ज्याला हिंसा समजून घ्यायची आहे त्याला देश, धर्म, पक्ष, विभाजक पध्दत नसते; त्याला मानवजात संपूर्ण समजण्याची तळमळ असते.*’

या जगातून–मानवी मनातून–संपूर्ण हिंसा निपटून निघावी म्हणून कृष्णमूर्तींनी सांगितलेली संपूर्ण क्रांती मानवी जाणीवेमध्ये कशी घडून येईल हे मानवापुढे असलेले एक मोठे आव्हान आहे आणि आपण त्याला कसे सामोरे जाणार ह्याचा कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीतून शोध घेण्याचा प्रयत्न या अंकातून केला आहे.

## कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री येथील मराठी शिबीर

कृष्णमूर्ती अध्ययन केन्द्र सह्याद्री येथे होणारे वार्षिक मराठी शिबीर या वर्षी मे २२ ते २७ या दरम्यान होणार आहे. शिबिराचा विषय आहे – 'जीवन म्हणजे नाते–संबंध'. या शिबिराचा हेतू आहे: जीवनात रुची असलेल्या व्यक्तींनी एकत्र येऊन मानवी जीवनातील मूलभूत समस्यांचा जे. कृष्णमूर्तींच्या शिकवणीच्या अनुशंगाने शोध घेणे व त्यांचे आकलन करून घेणे.

शिबिराच्या कार्यक्रमात मौनसत्र, कृष्णमूर्तींची ध्वनिचित्रफित, गटचर्चा, व्याख्याने, परिसंवाद, संध्याकालीन फिरणे, योगासने, सांस्कृतिक कार्यक्रम, इ.चा समावेश असेल. संपूर्ण कार्यक्रम मराठीत आयोजित केला जाईल. फक्त कृष्णमूर्तींची ध्वनिचित्रफित इंग्रजीत दाखविण्यात येईल. तथापि त्यातील सारांश मराठीत स्पष्ट करून सांगण्यात येईल.



अधिक माहितीसाठी खालील पत्त्यावर/फोनवर/ईमेल वर संपर्क साधावा.

संचालक, कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र सह्याद्री,
पोस्ट – तिवई हिल, तालुका खेड (राजगुरुनगर),
जिल्हा – पुणे, पिन – ४१०५१३, महाराष्ट्र
दूरध्वनी : (०२१३५) २८८७७२, २८८३४८, २८४३४६
• ईमेल - kscskfi@gmail.com
• वेबसाईट : http://www.kscskfi.com

## वार्षिक संमेलन





कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाच्या विद्यमाने होणारे वार्षिक संमेलन या वर्षी राजघाट येथील कृष्णमूर्ती अध्ययन केन्द्र, वाराणसी येथे ११ ते १४ नोव्हेंबर २००९ या दरम्यान होणार आहे.

अधिक माहिती साठी खालील पत्त्यावर /फोनवर/ईमेल वर संपर्क साधावा.

कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
राजघाट फोर्ट, वाराणसी–२२१ ००१.
ई. मेल. kcentrevns@gmail.com
फोन: ०५४२ – २४४१२८९, २४४०४५३

### कृष्णमूर्ती अध्ययन केंद्र, सह्याद्री (KFI) येथील विशेष अध्ययन कार्यशाळा

| | |
|---|---|
| ११ ते १७ जून २००९ | What will make us Change? |
| ९ ते १५ जुलै २००९ | Three Arts and the Art of Living |
| ३ ते ७ ऑगस्ट २००९ | Our Relationship with Nature |
| २१ ते २५ सप्टेंबर २००९ | Creativity in Daily Living |

## तुम्ही हिंसक आहात हे समजून घेणे हे पहिले काम

प्राणी हिंसक असतात. मनुष्यप्राणी आणि जे प्राण्यापासून विकसित झाले आहेत ते सुध्दा हिंसक आहेत. हिंसक असणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक भाग आहे. राग येणे, मत्सरी असणे, सत्तेच्या मागे धावणे, मानप्रतिष्टेच्या मागे धावणे, आणि असेच इतर काही; हुकुमत गाजवणे, आक्रमक असणे इ., मनुष्य हा हिंसक आहे हे आजवरच्या हजारो युध्दांनी सिध्द झालेले आहे. आणि माणसाने असे एक तत्वज्ञान विकसित केले आहे की ज्याला तो अहिंसा म्हणतो.

आणि जेव्हा तिथे प्रत्यक्ष हिंसा असते – जसे एक राष्ट्र आणि दुसऱ्या राष्ट्रांमधील युध्द तेव्हा प्रत्येकजण त्यामध्ये गुंतलेला असतो. ते त्यांना आवडते. आता जेव्हा तुम्ही प्रत्यक्षात हिंसक असता आणि तुमच्याकडे अहिंसेचा आदर्श असतो तेव्हा तुमच्यासमोर संघर्ष असतो. तुम्ही नेहमीच अहिंसक होण्याचा प्रयत्न करीत असता, जो संघर्षाचाच भाग असतो. तुम्ही स्वत:ला हिंसक न होण्याची शिस्त लावता, जो पुन्हा एक संघर्षच असतो, एक घर्षण असते. म्हणून जेव्हा तुम्ही हिंसक असता आणि तुमच्याजवळ अहिंसेचा आदर्श असतो तेव्हा तुम्ही प्रत्यक्षात हिंसक असता. तर मग तुम्ही हिंसक आहात ही गोष्ट समजून घेणे हे पहिले काम – अहिंसक बनण्याचा प्रयत्न करणे हे नव्हे. हिंसा जशी आहे तशी पाहणे, तिचे रुपांतर करण्याचा प्रयत्न न करता, तिला वळण देण्याचा प्रयत्न न करता, ती जिंकण्याचा प्रयत्न न करता, ती दाबून टाकण्याचा प्रयत्न न करता, तर ती जशी आहे तशी पाहणे. तिला प्रथमच तुम्ही पाहत आहात अशा दृष्टीने पाहणे, म्हणजेच कुठच्याही विचाराशिवाय तिला पाहणे. मी या अगोदर तुम्हाला स्पष्ट करून सांगितले आहे की वृक्षाकडे निरागसतेने पाहणे म्हणजे काय ते – म्हणजेच कोणत्याही प्रतिमेशिवाय त्याकडे पाहणे. त्याचप्रमाणे तुम्हाला हिंसेकडे पाहता आले पाहिजे. हिंसा या शब्दामध्ये अडकलेल्या प्रतिमेशिवाय, तिच्याकडे कुठच्याही विचाराच्या हालचालीशिवाय पाहिले पाहिजे. म्हणजेच हिंसेकडे तुम्ही अगदी प्रथमच पाहत आहात असे पाहणे आणि म्हणूनच निरागसतेने पाहणे.

*द बुक ऑफ लाइफ, २५ जून*

# जे. कृष्णमूर्ती ऑनलाइन - नवीन वेबसाइट

## जे. कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीची – व्हिडिओ, ऑडिओ आणि लिखित साहित्याची अधिकृत खात्री आणि इंटरनेटवर मोफत उपलब्धता

कृष्णमूर्तींच्या शिकवणुकीचे जतन करण्यासाठी तसेच त्यांचे काम सर्वांपर्यंत पोचविण्याच्या उद्देशाने जगभरातील जी कृष्णमूर्ती फाउंडेशन्स प्रस्थापित केली गेली, त्यांनी एकत्रितपणे www. jkrishnamurti.org ही एक नवीन वेबसाइट (संकेतस्थळ) अलिकडेच सुरू केली आहे. ही साइट कृष्णमूर्तींच्या १९३३ ते १९८६ पर्यंत प्रकाशित झालेल्या साहित्यामधील मोठ्या प्रमाणातील अधिकृत संग्रहित लिखाणाची खात्री देत आहे. हे संग्रहित साहित्य सुमारे २०० सर्वसाधारण आकाराची पुस्तके होतील एवढे आहे. या साइटवरील सर्व साहित्य संगणकाद्वारे सर्च इंजिनमार्फत शोधता येते आणि आपल्या संगणकावर शब्दरचना पद्धतीमध्ये मोफत उतरवून घेता येते. काही निवडक व्हिडिओज् (ध्वनिचित्रमुद्रणे) आणि ऑडिओज् (ध्वनिमुद्रणे) देखील उतरवून साठवून घेण्याजोग्या रचनापद्धतीमध्ये उपलब्ध आहेत. भविष्यात आजवर प्रकाशित न केलेले साहित्य या ऑनलाइन संग्रहामध्ये समाविष्ट केले जाईल आणि ऑडिओ–व्हिडिओची क्षमतादेखील वाढविली जाईल.

ही वेबसाइट म्हणजे अनेक संस्थांनी एकत्र येऊन केलेली निर्मिती आहे. ओहाय, कॅलिफोर्निया येथील कृष्णमूर्ती फाउंडेशन ऑफ अमेरिका; इंग्लंडमधील कृष्णमूर्ती फाउंडेशन ट्रस्ट, चेन्नई येथील कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया, आणि स्पेनमधील फाँदेशिआँ कृष्णमूर्ती लॅटिन अमेरिकाना.

**आंतरराष्ट्रीय शिकवणूक प्रकल्प (International Teachings Project)** हा जगात या क्षेत्रात घडत असलेल्या दोन निर्णायक स्थित्यंतरांच्या वेळीच जन्माला आला आहे : तांत्रिक प्रगती, ज्यामुळे अपार ज्ञानाचा साठा जगाच्या कानाकोपऱ्यात पोचविणे शक्य झाले आहे; आणि अशा निरनिराळ्या वेबसाइटस्ची झपाट्याने झालेली वाढ, ज्या कृष्णमूर्तींच्या साहित्यातून अनाधिकृतपणे काढलेली वचने–माहिती सर्वांना पुरवित आहेत. कॉपीराइट (ग्रंथकाराच्या हक्का) च्या उल्लंघनाखेरीज, कृष्णमूर्ती फाउंडेशनच्या संशोधनामधून असे दिसून आले आहे की अशा वेबसाइटवर बऱ्याचशा मूळ साहित्याची पुनर्रचना केली जाते आणि काही वेळा तर कोण्या अनामिक व्यक्तींची खाजगी मते आणि स्वत:चेच अर्थ घालून मूळ मजकूर पुन्हा लिहून काढलेला असतो. मात्र ही नवीन अधिकृत वेबसाइट अस्सलपणाची, खरेपणाची ग्वाही देत असून, सहजपणे उपलब्ध आहे आणि तीसुद्धा काहीही आकार न भरता.

ही वेबसाइट सर्वांसाठी बीटा–साधारण स्वरूपात उपलब्ध केली गेली आहे. कारण या वेबसाइटवर अजून प्रचंड प्रमाणावर पुढचे काम करावयाचे आहे. व्यक्ती, अभ्यासक, मानसिक आरोग्य आणि कल्याण, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इ. सारख्या अनेक क्षेत्रातील तज्ञ अशांच्या उपयोगासाठी या वेबसाइटची संभाव्य क्षमता वाढविता येऊ शकते. शिवाय कृष्णमूर्तींच्या आयुष्यभराच्या कार्यामधील सुमारे ५० टक्के साहित्य अजूनही अप्रकाशित आहे आणि कालांतराने ते या साइटवरील संग्रहामध्ये समाविष्ट केले जाईल.

अशा प्रकारच्या प्रकल्पाची पूर्ण क्षमता गाठण्यासाठी बराचसा निधी लागतो आणि कृष्णमूर्ती फाउंडेशन्स् त्यांच्या निधीच्या गरजेबद्दल त्यांच्या हितचिंतकांना संपर्क करण्यासाठी प्रयत्नरत आहेत. या खर्चात साइट–डिझाइनचा विकास, इंटरनेटवरील होस्टिंग, सर्च इंजिनसाठी लागणारे पायाभूत डेटाबेस, पुढच्या मजकुराचे डिजिटायझेशन, व्हिडिओ आणि ऑडिओ साहित्य आणि माहिती संग्रहाची अनुक्रमणिका बनविणे या सर्वांचा अंतर्भाव आहे. व्हिडिओ–ऑडिओ विभाग वाढवून त्यातील माहिती शोधून काढण्याजोगे इंटरनेटवरील वाचनालय बनविण्याच्या कामाला देखील सुरुवात होईल. लांबच्या पल्ल्यामध्ये साइटची रचना आणि त्यातील साहित्य हे स्पॅनिश, फ्रेंच आणि जर्मन भाषेमध्ये उपलब्ध करून देण्याची योजना आहे; तसेच साइटमध्ये असलेल्या सोयींमध्ये सुधारणा करून अभ्यासकांना या माहिती साठ्यामधून मजकूर, अवतरणे, ऑडिओ/ व्हिडिओ साहित्य निवडून आपले खाजगी माहितीसंग्रह या साइटवरतीच आपल्या वैयक्तिक खात्यात साठवून वापरण्याची सोय देता येईल.



www. jkrishnamurti.org



## हिंसेचे निरीक्षण

**प्रश्नकर्ता:** मी जर हिंसेकडे उत्कटतेने काळजीपूर्वक पाहिले, तर हिंसेपासून मुक्त होईन का?

**कृष्णमूर्ती:** हिंसेचा प्रश्न – प्रश्नकर्त्याने असा प्रयत्न केला आहे का, की त्याची अशी केवळ कल्पना आहे: मी जर हे केलं, तर मला ते मिळेल का? 'उत्कटतेने पाहणे' म्हणजे काय? काळजीपूर्वक पाहणे, जसे आपण एखाद्या लहान मुलाकडे आस्थेने पाहतो. जेव्हा तुम्ही लहानग्या मुलाकडे काळजीपूर्वक पाहता तेव्हा काय होतं? तुम्ही त्याचा धिक्कार करीत नाही, करता का? तुम्ही असं म्हणत नाही की हे मूल त्या दुसऱ्या मुलाएवढं हुशार नाही. कदाचित तुम्ही तसं करता – याचा अर्थ तुम्हाला खरोखरीची आस्था नसते. जेव्हा तुम्ही तुलना करीत असता, धिक्कार करीत असता, त्याच्याविषयी मनात ग्रह बनवीत असता, तेव्हा तुम्ही त्या मुलाकडे पाहत नसता. जेव्हा तुम्ही अहिंसेच्या कल्पनेतून हिंसेचा धिक्कार करता आणि जेव्हा तुम्हाला हिंसेला झटकून द्यायचं असतं, तेव्हा त्यात सूचित असलेल्या साऱ्या मानसिकतेच्या ध्वन्यर्थाचं आणि हिंसेच्या रचनेचं तुम्ही निरीक्षण करू शकत नाही. जेव्हा तुम्ही पूर्णत: निरीक्षण करता, तेव्हाच तिथे हिंसेचा अंत असतो. तुम्ही हे करू शकता: जर केलेत तर तुम्हाला स्वत:लाच ते सापडेल. कोणालाही विचारू नका, तर कृतीत आणा आणि शोधून काढा.

राजघाट, वाराणसी येथील भाषण ३, १९६३

## युद्ध: आपलेच एक नेत्रदीपक, रक्तलांछित प्रक्षेपण

युद्धाचा ज्वर असा चढत असतानाच कृष्णजींनी त्यांची ओहायमधील ओक ग्रोव्हज् भाषणांची मालिका सुरू केली. मला त्यांच्याबद्दल काळजी वाटत होती आणि अशा प्रकारच्या असामान्य परिस्थितीत आपली युद्धविरोधी मते जरा सौम्य करून मांडतात की काय अशी शंका होती. पण त्यांनी तसे नाही केले. जणू काही युद्ध सुरूच नव्हते अशा थाटात त्यांनी या 'युद्ध नावाच्या सामुहिक खुना'वर ताशेरे ओढले आणि ठामपणे सांगितले की 'कुणाचीही हत्या करणे हे जगातील सर्वात मोठे दुष्कर्म आहे.' युद्धखोर, विरोधी प्रश्नकर्त्यांना अत्यंत शांत, सौम्यपणे त्यांनी आठवण करून दिली की त्यांच्याशी कोण सहमत नाही ही त्यांची समस्या नसून त्यांचे आंतरिक वैर हीच समस्या आहे. 'तुम्ही स्वत:च्या अंतर्गत युद्धाचा विचार करा, त्याबद्दल जागरुक रहा. बाहेरील युद्धाबद्दल नव्हे' असेच ते त्यांना सतत सांगत राहिले.

एक वेळ तर अशी आली की मला वाटले खूप मोठे भांडण जुंपणार. पण तशा परिस्थितीतदेखील त्यांचा शांतपणा केवळ वाखाणण्याजोगा होता. मला वाटले आता यांच्यावर देखरेख ठेवणारे अधिकारी त्यांचे भाषण तरी पूर्ण होऊ देतात की नाही. 'एफबीआय'चे लोक प्रेक्षकात होते.

सिडनी फिल्ड लिखित *The Reluctant Messiah*

## तुम्ही स्वत:ला समजून घेतल्याशिवाय शांती येणार नाही

जगात शांतता आणण्यासाठी, सगळी युध्दे थांबविण्यासाठी, प्रत्येक व्यक्तिमध्ये परिवर्तन झाले पाहिजे, तुमच्यामध्ये आणि माझ्यामध्ये. आर्थिक क्रांती या मानसिक परिवर्तनाशिवाय अर्थशून्य आहे. कारण आपल्या मानसिक अवस्थेमधून निर्माण झालेल्या लोभ, द्वेष, मत्सर, आसक्ती या विसंगतीमुळे आर्थिक असमतोल निर्माण होतो आणि त्यातून उपासमार जन्माला येते. दु:खाचा, उपासमारीचा, युध्दाचा शेवट करण्यासाठी मानसिक परिवर्तन झाले पाहिजे आणि आपल्यापैकी फारच थोडे जण या परिस्थितीला तोंड देण्यास तयार असतात. आपण शांततेबद्दल चर्चा करू, कायद्याने योजना आखू, नवीन पक्ष-संस्था निर्माण करू, संयुक्त राष्ट्रासारखी इ. इ., परंतु आपण शांती मिळवू शकणार नाही: कारण आपण आपले स्थान सोडणार नाही,आपली सत्ता, आपला पैसा, आपल्या इस्टेटी, आपली मूर्ख जीवने. दुसऱ्यावर अवलंबून राहणे केवळ निरर्थक आहे. दुसरा आपल्यासाठी शांती आणू शकत नाही. कुठचाही नेता आपल्याला शांती देणार नाही. कुठचेही शासन, कुठचेही सैन्य, कुठचेही राष्ट्र आपल्याला शांती बहाल करणार नाही. आपल्यामधील परिवर्तनच शांती घडवून आणेल, जे परिवर्तन बाह्य कृती घडवून आणेल. आंतरिक परिवर्तन म्हणजे एकटेपणा नव्हे, बाहेरील कृतीपासून निवृत्त होणे नव्हे. याच्या उलट जेव्हा योग्य विचार करणे असते तेव्हाच तेथे योग्य कृती होऊ शकते. आणि जेव्हा आत्मबोध नसतो तेव्हा तिथे योग्य विचार करणे नसते. तुम्ही स्वत:ला समजून घेतल्याशिवाय शांती येणार नाही

बाहेरील युध्दाचा अंत करण्यासाठी, तुम्ही तुमच्या आतील युध्दाचा शेवट करण्याची सुरुवात केली पाहिजे. तुमच्यामधील काही डोकी माना हलवतील आणि म्हणतील, 'मला मान्य आहे; आणि बाहेर जातील आणि गेली १०-२० वर्षे जे काही करत आले आहेत अगदी तसेच पुन्हा करतील. तुमची कबुली ही केवळ शाब्दिक असते आणि त्याला काहीच अर्थ नसतो. कारण जगातील दु:खे आणि युध्दे ही तुमच्या सहज होकार देण्यामुळे थांबली जाणार नाहीत. ती फक्त तेव्हाच थांबली जातील जेव्हा तुम्ही तो धोका प्रत्यक्ष पाहाल, ज्यावेळी तुम्हाला तुमची जबाबदारी समजेल आणि तुम्ही ती दुसऱ्या कोणावर सोपवणार नाहीत. जर तुम्हाला दु:खाची अनुभूती आली, जर तुम्हाला तात्काळ कृती करण्याची निकड भासली आणि तुम्ही ती पुढे ढकलली नाही, तरच तुम्ही स्वत:चे परिवर्तन कराल. ज्यावेळी तुम्ही स्वत: शांत असाल त्याच वेळी शांती येईल. ज्यावेळी तुम्ही स्वत: तुमच्या शेजाऱ्याबरोबर शांततेने राहात असाल त्याचवेळी शांती येईल.

*प्रथम अर्थात अंतिम मुक्ती,* प्रश्न १०

# परीक्षण

## या गोष्टींचा विचार करा




*संस्कृतीचा प्रश्न* या नावाने कृष्णमूर्तींच्या अभ्यासकांना आतापर्यंत परिचित असलेले हे एक महत्वाचे पुस्तक नवीन आवृत्तीमध्ये *या गोष्टींचा विचार करा* या नावाने नवीन रुपात अलिकडेच साकेत प्रकाशनाने आपल्याला उपलब्ध करून दिले आहे. इंग्रजीतील पूर्वीच्या *This Matter of Culture* आणि आता नव्याने कृष्णमूर्ती फाऊंडेशनने स्वस्त आवृत्तीमध्ये प्रकाशित केलेल्या *Think on These Things* या पुस्तकाचा हा सुंदर अनुवाद श्री दिवाकर घैसास यांनी अगदी सोप्या सरळ भाषेत केलेला आहे.

कृष्णमूर्तींची प्रवचने, तसेच त्यांनी भारतातील विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांशी केलेल्या चर्चेचा समावेश असलेले हे पुस्तक भारतातील आजच्या शिक्षण या अत्यंत जटील विषयावर परखडपणे प्रकाश टाकणारे आहे. कृष्णमूर्तींच्या शिकवणीशी नव्याने परिचित झालेल्या युवक-प्रौढांना या पुस्तकाद्वारे त्यांच्या शिकवणीची ओळख होऊ शकेल. दैनंदिन जीवनाला भिडणाऱ्या अनेक महत्वाच्या समस्यांवर कृष्णमूर्तींशी झालेली चर्चा आपल्याला अंतर्मुख करून विचार करायला लावते.

*'जेव्हा प्रतिमा, कर्मकांडे, श्रध्दा, प्रतीके, सारे शब्दसंभार मंत्र आणि त्यांचे जप आणि सर्व प्रकारचे भयही मनातून झाडून टाकले जाईल तेव्हा तुम्ही जे पहाल ते सत्य असेल, कालविरहीत असेल, चिंरतन असेल आणि त्याला ईश्वर म्हणता येईल'.*

*'खरा धर्म म्हणजे ईश्वराचा शोध, सत्याचा शोध व संपूर्णपणे चांगले असण्याची भावना होय. त्यात भलेपणा मुद्दाम जोपासून वाढविणे नसते, नम्रता मुद्दाम धारण करणे नसते; पण मनाच्या कल्पनांच्या व लबा ांच्या अगदी पलीकडे असणाऱ्या कोणत्या तरी अनामिक तत्वाचा मागोवा असतो'.*

अशा धक्कादायक विधानांनी ते आपल्याला आपल्या संभ्रमातून जागे करण्याचा प्रयत्न करतात.

२५६ पानी या आकर्षक पुस्तकाची किंमत रुपये १९५/- असून ते मुंबई केन्द्र आणि कृष्णमूर्ती अध्ययन केन्द सह्याद्री तसेच सर्व महत्वाच्या पुस्तक विक्रेत्यांकडे उपलब्ध आहे.

---

## आनंद विहार येथील वार्षिक संमेलन

आनंद विहार या कृष्णमूर्ती अध्ययन केन्द्र, जांभीळघर, बदलापूर येथे १५ फेब्रुवारी २००९ रोजी एक दिवसीय वार्षिक संमेलन आयोजित करण्यात आले होते.

या वार्षिक संमेलनाला मुंबई, पुणे, नाशिक, येथून ५० अभ्यासक आले होते. श्री राजेश दलाल मुख्य पाहुणे म्हणून लाभले होते. विषय होता - कृष्णमूर्ती यांची शिकवण जगणे म्हणजे नेमके काय?

सकाळी १० वाजता संमेलनाला सुरुवात झाली. प्रास्ताविक झाल्यानंतर श्री राजेश दलाल यांनी विषयाच्या अनुषंगाने कृष्णमूर्तींना यासंबंधी काय म्हणायचे होते हे थोडक्यात सांगितले आणि कृष्णमूर्तींची शिकवण प्रत्येकाच्या जगण्याशी निगडीत आहे ह्याकडे लक्ष वेधले.

दुसऱ्या सत्रामध्ये त्या विषयावर पुन्हा प्रश्नोत्तरे झाली आणि अनेक अभ्यासक या परिसंवादामध्ये सहभागी झाले होते.

जे कृष्णमूर्ती सेल्फ-एज्युकेशन सोसायटीच्या आनंद विहार, बदलापूर येथील अध्ययन केंद्राच्या संपूर्ण व्यवस्थापनासाठी निवासी इस्टेट मॅनेजरची जरुरी आहे.

**संपर्क:** अभिजित पडते,

**इमेल:** abhijit.padte@gmail.com

**मोबाईल:** 98201 23567

## तुमची बांधिलकी ही तुमच्या सुरक्षिततेत असते

मानवजातीचे अश्रू माणसाची मारण्याची ईर्ष्या थांबवू शकलेले नाहीत. कुठचाही धर्म युध्द धांबवू शकलेला नाही - सगळी युध्दे. त्या उलट, त्या सर्वांना त्यांनी उत्तेजनच दिले आहे. युध्दाच्या शस्त्रांना त्यांनी आशिर्वादच दिले आहेत. त्यांनी लोकांना विभक्त केले आहे, सरकारे एकाकी पडली आहेत आणि ती या विभाजनाला खतपाणी घालत आहेत. शास्त्रज्ञांना शासन मदत करीत आहे. पुरोहित हे शब्दांमध्ये आणि प्रतिमांमध्ये हरवले आहेत.

तुम्ही रडाल, परंतु तुमच्या मुलांना मारण्याचे आणि मरून जाण्याचेच शिक्षण देणार. तुम्ही ते जगण्याचा एक मार्ग म्हणून स्वीकारता. तुमची बांधिलकी ही तुमच्या सुरक्षिततेशी असते. तो तुमचा देव आणि तुमचे दुःख असते.

*कृष्णमूर्तींची रोजनिशी,* १७ऑक्टोबर, १९७३

# आदर्शवादातून हिंसेकडे पाहिल्यामुळे काळाचे मध्यंतर निर्माण होते



आपण प्राण्याकडून हिंसेचा वारसा घेतलेला आहे. परंतु प्राण्याने अहिंसेचा शोध लावलेला नाही – अहिंसेचा आदर्शवाद; माणसाने मात्र त्याचा शोध लावला. हिंसा तिथे अस्तित्वात आहे, आणि आदर्शवाद हा अवास्तव आहे. ती वस्तुस्थिती आहे, ती हिंसा आहे. परंतु आपण असा विचार करतो की हिंसेबद्दल आदर्शवाद बाळगला तर आपण हिंसेपासून परावृत्त होऊ. हा केवळ मूर्खपणा आहे. आणि या देशात हे सिद्ध झालेले आहे. तुम्ही चाळीस वर्षे अहिंसेचा उपदेश केला आहे. पण जेव्हा हिंसेची वेळ येते तेव्हा तुम्ही सगळे त्यात उडी घेता!

तेव्हा वस्तुस्थिती एक गोष्ट आहे आणि आदर्श ही दुसरीच. आपण हिंसक आहोत; आपण प्राण्याकडून ते वारशाने घेतलेले आहे, आपल्यामधील जनावराला दोन हक्क आहेत, मालकी हक्क आणि लैंगिग हक्क. आणि हिंसा ही त्यावर आधारलेली आहे. आपण हिंसक आहोत ही वस्तुस्थिती आहे आता तुम्ही ही वस्तुस्थिती ऐकता आणि ऐकणे केवळ बौद्धिक असते. आणि तुम्ही म्हणता, "मी हिंसेशिवाय कसा जगू शकतो? जेव्हा पाकिस्तान, चीन किंवा दुसरा कुठचा तरी देश माझ्यावर आक्रमण करायला येतो मी माझे संरक्षण केले पाहिजे आणि तुमच्याजवळ या मुद्याच्या बाजूने आणि विरुध्द, असंख्य वादविवाद–सबबी हजर असतात आणि तरीसुध्दा अखेर शेवटी तुम्ही हिंसकच राहता.

तेव्हा तुम्ही हिंसेची वस्तुस्थिती पाहू शकता का? वस्तुस्थिती जी केवळ तुमच्या बाहेरच नव्हे तर आतसुद्धा आहे आणि त्या ऐकण्यात आणि कृती करण्यामध्ये काळाचे काहीही अंतर नसणे शक्य आहे का? म्हणजे ऐकण्याची कृती करतानाच तुम्ही हिंसेपासून संपूर्ण मुक्त होता कारण तुम्ही ज्यामुळे तुम्ही हिंसेपासून मुक्त होऊ शकता अशा आदर्शवादाला, काळाला मध्ये येऊ दिलेले नाही. यासाठी सखोल चिंतनाची गरज आहे.

केवळ शाब्दिक कबुली किंवा दुमत नव्हे. आपण कधीच काहीही ऐकत नाही. आमची मने, आमच्या मेंदूच्या पेशी हिंसेच्या आदर्शवादाने इतकी संस्कारबध्द झालेले आहेत की आपण हिंसेच्या वस्तुस्थितीकडे कधी बघतच नाही. आपण आदर्शवादाच्या माध्यमातून हिंसेच्या वस्तुस्थितीकडे पाहतो आणि आदर्शवादामधून हिंसेकडे पाहण्यामुळे काळाचे मध्यंतर निर्माण होते. आणि जेव्हा तुम्ही काळ स्वीकारता तेव्हा तिथे हिंसेचा अंत होत नसतो. तुम्ही अहिंसेचे धडे देत, शिकवीत, हिंसाच प्रदर्शित करीत असता.

*मद्रास येथील दुसरे भाषण, १९६७*

---

# हिंसेचे मुख्य कारण

मला वाटते, हिंसेचे मुख्य कारण हे आहे की आपल्यापैकी प्रत्येकजण मानसिकदृष्ट्या आतून सुरक्षितता शोधत असतो. आपल्यापैकी प्रत्येकामध्ये मानसिकदृष्ट्या सुरक्षिततेची उत्कट इच्छा – सुरक्षित असण्याची एक आंतरिक भावना सुरक्षिततेची बाह्यत: मागणी असते. ते आंतरिक मागणीचे प्रक्षेपण असते. आंतरिकदृष्ट्या प्रत्येकाला सुरक्षितता, खात्री, निश्चिती पाहिजे असते म्हणूनच आपल्याकडे हे सगळे लग्नविषयक कायदे आले आहेत; स्त्रीला किंवा पुरुषाला आपले स्वामित्व गाजविण्यासाठी आणि त्याद्वारे नातेसंबंधामध्ये सुरक्षित असण्यासाठी. आणि जर त्या नातेसंबंधावर आक्रमण झाले तर आपण हिंसक बनतो, जी मनाची आंतरिक मागणी गरज असते – प्रत्येक गोष्टीशी असलेल्या आपल्या नातेसंबंधामध्ये निश्चिती असण्याची गरज. परंतु कुठल्याही नातेसंबंधामध्ये निश्चिती, सुरक्षितता अशी काही गोष्टच नसते. आंतरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या आपल्याला सुरक्षित असणे आवडते, परंतु कायमची सुरक्षितता अशी काही गोष्टच नाही...

तेव्हा आज सर्व जगामध्ये प्रचलित असलेल्या, थैमान घालत असलेल्या हिंसेला सहाय्यभूत होणारी ही सर्व कारणे आहेत. मला वाटते कोणीही, जे काही जगात चालले आहे त्याचे थोडेसे निरीक्षण केले असेल, आणि विशेषत: जे या अभागी देशात चालले आहे त्याचे, तर खूप बौध्दिक अभ्यासाशिवाय तो हे पाहू शकेल आणि त्याच्या स्वत:मध्ये अशा गोष्टी शोधू शकेल, ज्या बाह्यत: अभिव्यक्त केल्या तर असामान्य क्रूरतेला, बेजबाबदारीला, बेपवाईला, हिंसेला कारणीभूत असतात.

*द बुक ऑफ लाइफ, २७ जून*

## संघर्ष आंतरिक किंवा बाह्य - हिंसेला कारणीभूत होतो

हिंसा सगळीकडे आहे, उच्च शिक्षितांमध्ये, मागासलेल्या लोकांमध्ये, बुध्दिवंतांमध्ये, आणि भावनाविवश लोकांमध्ये देखील आहे. शिक्षण किंवा संघटित धर्म कोणीही माणसाला काबूत ठेवू शकले नाही; उलट युध्दे, छळ, मृत्यूचे कोंडवाडे, जमिनीवरील व सागरी प्राण्यांचे कत्तल खाने यांना तेच जबाबदार आहेत. माणूस जेवढी प्रगती करतोय तेवढा तो जास्त क्रूर होतोय असे दिसते. राजकारण म्हणजे गुंडगिरी झाली आहे, एक समुह दुसऱ्या समुहाच्या विरोधात उभा आहे; राष्ट्रीयवादाने युध्दे निर्माण केली आहेत; आर्थिक लढाया आहेत, व्यक्तिगत द्वेष व हिंसाचार आहे. माणूस अनुभव आणि ज्ञानातून काहीच शिकलेला दिसत नाही आणि हिंसा अनेक स्वरूपात चालू आहे. मानवाच्या आणि त्याच्या समाजाच्या परिवर्तनात ज्ञानाला काय जागा आहे?

ज्ञान गोळा करण्यात जी ऊर्जा वापरली गेली त्याने माणूस बदलला नाही. ती ऊर्जा हिंसा थांबवू शकली नाही. माणूस आक्रमक, क्रूर, कठोर का झाला ह्याची हजारो स्पष्टीकरणे करण्यात खर्ची घातलेली ऊर्जा माणसाची क्रूरता संपवू शकली नाही. माणसाचा अविचारी विध्वंस, त्याचा हिंसेतील आनंद, विकृती, आक्रमक आचार त्यांच्या कारणांच्या विश्लेषणांत वाया घालवलेल्या ऊर्जेने कुठल्याही माणसाला विचारी व सौम्य बनवले नाही. अनेक वक्तव्ये आणि पुस्तके, शिक्षा आणि धमक्या हे सर्व वापरून सुध्दा माणूस हिंसकच राहिला आहे.

हिंसा फक्त मारण्यात, बॉम्ब फेकण्यात, रक्तलांछित क्रांतीकारक बदलांमध्येच आहे असे नाही; ती खूप खोल आणि सूक्ष्म आहे. अनुसरण आणि अनुकरण हे हिंसादर्शक आहेत. जबरदस्ती व अधिकार स्वीकारणे हे हिंसेचेच द्योतक आहेत. महत्वाकांक्षा आणि स्पर्धा हे त्या आक्रमकतेचे व क्रूरतेचे अविष्कार आहेत, आणि तुलना तिच्या द्वेष व शत्रुत्वासहित मत्सराला जन्म देते. संघर्ष, मग तो आंतरिक असेल किंवा बाह्य असेल, हिंसेला कारणीभूत होतो. विभाजन त्याच्या सर्व रूपात संघर्ष व यातना निर्माण करते.

*कृष्णमूर्तींची रोजनिशी, ब्रॉकवुड पार्क,*
१० ऑक्टोबर १९७३

### हिंसेबद्दल कृष्णमूर्तींची विधाने असलेली काही पुस्तके:

Beyond Violence
हिंसावृत्तीच्या पलीकडे
Commentaries on Living -III
जीवनभाष्ये खंड – ३
Freedom from the Known
ज्ञातापासून मुक्ती
You Are the World
Social Responsibility
Krishnamurti on Education
शिक्षण-संवाद
Why are you being Educated?

कृष्णमूर्तींविषयीच्या काही वेबसाईटस् :

http://jkrishnamurti.org
www.kfionline.org
www.kfa.org
www.kfoundation.org
www.kinfonet.org

जे. कृष्णमूर्ती यांची शिकवण सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया' ही संस्था कार्यरत आहे. फाउंडेशनने चेन्नई, ऋषी व्हॅली, बंगलोर, मुंबई, वाराणसी आणि सह्याद्री येथे अध्ययन केंद्रे, शाळा स्थापन केल्या आहेत. बऱ्याच ठिकाणी तेथील ग्रामीण समाजासाठी विकास केंद्रेही आहेत.

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुख्य कार्यालय:** कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
वसंतविहार, १२४, ग्रीनवेज रोड, चेन्नई - ६०० ०२८.
दूरध्वनी : (०४४) २४९३ ७८०३/७५९६,
ई-मेल : kfihq@md2.vsnl.net.in
वेबसाईट : www.kfionline.org

**कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडियाचे मुंबई केंद्र** हिम्मत निवास, मलबार हिल येथे असून येथे कृष्णमूर्तींची सर्व पुस्तके, डिव्हीडीज् उपलब्ध आहेत.

**संपर्क** :- कृष्णमूर्ती फाउंडेशन इंडिया,
बॉम्बे एक्झिक्युटिव्ह कमिटी, हिम्मत निवास,
३१, डोंगरसी मार्ग, मलबार हिल, मुंबई-४००००६.
दूरध्वनी - २३६३३८५६
ई-मेल : kfimumbai@gmail.com

'अंतरलहरी' ही वृत्तपत्रिका दर चार महिन्यांनी प्रसिद्ध होणारी पत्रिका आहे. कृष्णजींच्या शिकवणीचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी कृष्णमूर्तींच्या साहित्याची मराठी भाषांतरे, त्यांच्या शिकवणीसंबंधी लेख, संस्थेच्या उपक्रमांची, अभ्यासकेंद्रांची तसेच पुस्तके वगैरेंची माहिती इ. ह्या पत्रिकेत प्रकाशित केली जाईल. आपल्याला ही पत्रिका घरपोच हवी असल्यास आमच्या मुंबई केंद्राच्या पत्त्यावर पत्र किंवा ई-मेल द्वारा कळवावे. कृपया आपले नाव, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी आणि ई-मेल ही माहिती कळवावी.

*Published in January, May, September*

Periodical

*Registered with The Registrar of Newspapers for India under No. MAHMAR/2008/25259*

*If undelivered please return to :*
**Krishnamurti Foundation India**
Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road,
Malabar Hill, Mumbai - 400 006.
Tel.: (022) 2363 3856 Email : kfimumbai@gmail.com

*Published by P.V. Dabholkar on behalf of Krishnamurti Foundation India, Bombay Executive Committee, Himmat Niwas, 31, Dongersey Road, Malabar Hill, Mumbai-400 006.*
*Printed by S.V. Limaye at India Printing Works, 42, G.D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031. E-mail : ipw@vsnl.net • Editor : Vasanti Padte*
*Designed by Eurythmic Designs, Rite-Print-Pak, Mumbai- 400 013. E-mail : info@Eurythmicdesigns.com*